जावक क्रमांक- 9238 /२०१८
पोलीस अधीक्षक ना.ह.सं.कोल्हापुर परिक्षेत्र,
कोल्हापुर यांचे कार्यालय,
दिनांक-23/१०/२०१८

प्रति,

मा. संपादक,
दैनिक

विषय — अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९ सुधारीत अधिनियम २०१५ या कायदयाची प्रसिध्दी व प्रभावी अंमलबजावणी करीता कार्यशाळा आयोजित केलेने त्याची आपले दैनिक वृत्तपत्रामध्ये प्रसिध्दी देणेबाबत.

———ooo———

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर की, मा.पोलीस अधीक्षक,पुणे ग्रामीण यांनी पोलीस अधीक्षक, नागरी हक्क संरक्षण कोल्हापूर परिक्षेत्र यांच्या समन्वयाने अनुसूचित जाती जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा १९८९ सुधारीत अधिनियम २०१५ व महाराष्ट्र सामाजिक बहिष्कार पासुन व्यक्तीचे संरक्षण,प्रतिबंध अधिनियम कायदा २०१६ या विषयाची कोल्हापूर परिक्षेत्रातील पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांचे करीता एक दिवसीय प्रशिक्षण कार्यशाळा दि.२५.१०.२०१८ रोजी ०९.३० ते १७.२० वा.पर्यंत स्वामी विवेकानंद सभागृह, एमआयटी कॉलेज, कोथरुड पुणे येथे आयोजित करण्यात आली आहे.

सदर कार्यशाळेसाठी उद्‌घाटक म्हणुन, श्री.शिवाजी बोडखे, पोलीस सहआयुक्त, पुणे शहर, हे उपस्थित राहणार असुन, श्री.कैसर खालिद, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य मुंबई, श्री.मकरंद रानडे, अप्पर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड आयुक्तालय, श्री नवलकिशोर राम (भाप्रसे), जिल्हाधिकारी पुणे, श्री.संदिप पाटील, पोलीस अधीक्षक, पुणे यांची विशेष उपस्थिती असणार आहे.

सदर कार्यशाळेच्या संपुर्ण कार्यक्रमाचे वृत्ताकंन करणेकरीता आपले कडील प्रतिनिधी तसेच फोटोग्राफर यांना पाठविणेबाबत विनंती आहे. तसेच आपल्या लोकप्रिय दैनिकामधुन याची व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देणेस, विनंती आहे.

(सदानंद गं.वायसे—पाटील)
पोलीस अधीक्षक,
ना.ह.सं.कोल्हापुर परिक्षेत्र, कोल्हापुर

# प्रेस नोट

दि. /१०/२०१८

अनुसुचित जाती जमाती ( अत्याचार प्रतिबंध अधिनियम १९८९, सुधारित अधिनियम २०१५ महाराष्ट्र समाजिक बहिष्कारापासुन व्यक्तीचे संरक्षण ( प्रतिबंध बंदी व निवारण ) अधिनियम २०१६ या कायदयाच्या प्रभावी अमंलबजावणी संदर्भात पोलीस अधिकारी व पोलीस जवानांसाठी एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमांबाबत.

पोलीस अधिक्षक, नागरी हक्क संरक्षण कोल्हापुर परिक्षेत्र, कोल्हापुर व पोलीस अधिक्षक, पुणे ग्रामीण यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२५/१०/२०१८ रोजी सकाळी ०९:३० वा स्वामी विवेकानंद सभागृह, एम.आय.टी.कॉलेज पौड रोड कोथरूड पुणे येथे अनुसुचित जाती व जमाती ( अत्याचार प्रतिबंध) अधिनियम १९८९, सुधारित अधिनियम २०१५ महाराष्ट्र समाजिक बहिष्कारापासुन व्यक्तीचे संरक्षण ( प्रतिबंध बंदी व निवारण ) अधिनियम २०१६ या कायदयाच्या प्रभावी अमंलबजावणी संदर्भात पोलीस अधिकारी व पोलीस जवानांसाठी एक दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

मा.श्री.शिवाजी बोडखे, सह.पोलीस आयुक्त पुणे शहर यांचे हस्ते या एक दिवसीय कार्यशाळचे उद्घाटन होणार असुन मा.श्री.कैसर खालिद, विशेष पोलीस महानिरीक्षक, नागरी हक्क संरक्षण, महाराष्ट्र राज्य मुंबई,मा. श्री मकरंद रानडे अप्पर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड आयुक्तालय,मा.श्री नवलकिशोर राम, जिल्हाधिकारी पुणे. मा.श्री.संदीप पाटील पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण. हे प्रमुख पाहुणे म्हणुन कार्यक्रमास उपस्थित राहणार आहेत.

श्रीमती उज्वला पवार, मुख्य जिल्हा सरकारी अभियोक्ता जिल्हा व सत्र न्यायालय पुणे शिवाजी नगर पुणे या अनुसुचित जाती व जमाती ( अत्याचार प्रतिबंध ) अधिनियम १९८९, सुधारित अधिनियम २०१५ या अनुषंगाने व्याख्यान देणार आहेत. मा.श्री.रविंद्र केदारी, माजी पोलीस उप महानिरीक्षक हे अनुसुचित जाती व जमाती ( (अत्याचार प्रतिबंध ) अधिनियम १९८९, सुधारित अधिनियम २०१५ अंतर्गत तपासाचे प्रभावी तंत्र या अनुषंगाने व्याख्यान देणार आहे तसेच श्री.प्रकाश पवार उपप्राचार्य फर्ग्युसन कॉलेज, पुणे. हे सामाजिक न्याय व अनुसुचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध)अधिनियम १९८९, सुधारित अधिनियम २०१५ अनुषंगाने व्याख्यान देणार आहेत.

या कार्यशाळेसाठी पोलीस आयुक्तालय, पुणे शहर, पिंपरी चिंचवड, सोलापुर, पुणे ग्रामीण, सोलापुर ग्रामीण , सांगली , कोल्हापुर व सातारा येथील अपर पोलीस आयुक्त, सहा.पोलीस आयुक्त, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, सहा.पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक, अशा दर्जाचे अधिकारी व तपासकामात मदत करणारे जवान असे सुमारे २५० अधिकारी व पोलीस जवान यांना निमंत्रित करण्यात आले आहेत.

ज्या नागरीकांना व कायदयाचे प्रशिक्षण घेणा-या विदयार्थाना कार्यशाळेत सहभागी व्हावयाचे असेल तर त्यांनी दि.२५/१०/२०१८ रोजी दुपारी ०२:०० नंतर सहभागी व्हावे असे आवाहन सदानंद वायसे- पाटील, पोलीस अधिक्षक, नागरी हक्क सरंक्षण विभाग, कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर यांनी केले आहे.

( सदानंद गंगाधर वायसे - पाटील )
पोलीस अधिक्षक,
नागरी हक्क संरक्षण,
कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर